५।३।५

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
13 MAR 2025
प्राप्त झाले सही......

656
18.03.2025

संचालनालय, लेखा व कोषागारे व अधिनस्त कार्यालयातील अस्थायी पदांना मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्र.सेवाप्र-२०२५/प्र.क्र.३५/कोषा प्रशा-३
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १२ मार्च, २०२५

वाचा:-

१) वित्त विभाग शासन निर्णय क्र.सेवाप्र-२०१९/प्र.क्र.१९४/कोषा प्रशा-३, दि.१५.१२.२०२१
२) वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेवाप्र-२०२४/प्र.क्र.२३/कोषा प्रशा-३, दि.१९.०९.२०२४
३) संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे पत्र क्र.संलेको/प्रशा.कोषा/प्र.क्र.१४३५-अ/कार्या-१/ अस्थायी पदे/मुदतवाढ/१३५/७०६, दि.१४.०२.२०२५
४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.,दि.०३.०३.२०२५

## शासन निर्णय

वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये लेखा व कोषागारे संचालनालय व त्यांच्या अधिनस्त कार्यालयासाठी सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय व त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील अस्थायी पदांना दि.०१.०९.२०२४ ते दि.२८.०२.२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अस्थायी पदांना दिलेली मुदतवाढ संपुष्टात आली असल्याने आता सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या एकूण १६७८ अस्थायी पदांना दि.०१.०३.२०२५ ते दि.३१.०८.२०२५ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे. यासाठी होणारा खर्च संबंधित लेखाशिर्षाखालील आर्थिक वर्ष सन २०२५-२०२६ या वित्तीय वर्षातील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

हे आदेश वित्त विभाग शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०३.०३.२०२५ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(ता.र.पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र: परिशिष्ट-अ

प्रत,

*१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)- १. महाराष्ट्र, मुंबई (पाच प्रती)

*२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)- २. महाराष्ट्र, नागपूर (पाच प्रती)
३. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
*४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
*५. सर्व विभागीय सह/उप संचालक, लेखा व कोषागारे
*६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
*७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
*८. सर्व कोषागार अधिकारी/सर्व उपकोषागार अधिकारी
९. कक्ष अधिकारी, प्रशासन ४, अर्थसंकल्प ७, आ.पु.क., वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. निवडनस्ती कोषा प्रशा-३.

(* संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)

# परिशिष्ट-अ

लेखा व कोषागारे संचालनालय व त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील दि.०१.०३.२०२५ ते दि.३१.०८.२०२५ पर्यंत मुदतवाढ मिळणेसाठीची अस्थायी पदे दर्शविणारे एकत्रित गोषवारा विवरणपत्र

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम | सुधारित आकृतीबंधानुसार मंजूर पदसंख्या (नियमित, नवीन पदसंख्या) |
|---|---|---|---|
| १ | अ | सह संचालक/ अधिदान व लेखा अधिकारी | ०९ |
| २ | अ | उपसंचालक/ कोषागार अधिकारी (संवर्ग उपसंचालक)/उप अधिदान व लेखा अधिकारी | ४७ |
| ३ | अ | सहायक संचालक/कोषागार अधिकारी/सहायक अधिदान व लेखा अधिकारी | ७५ |
| ४ | ब-राप | लेखा अधिकारी/अप्पर कोषागार अधिकारी | १८१ |
| ५ | ब-राप | स्वीय सहाय्यक | ०१ |
| ६ | ब-राप | सहायक लेखा अधिकारी/ उपकोषागार अधिकारी (उच्चश्रेणी) | ३०४ |
| ७ | ब-अराप | लघुलेखक (उच्चश्रेणी) | ०२ |
| ८ | ब-अराप | लघुलेखक (निम्नश्रेणी) | ०३ |
| ९ | क | वरिष्ठ लेखापाल | १४९ |
| १० | क | कनिष्ठ लेखापाल | ६२९ |
| ११ | क | लघुटंकलेखक | ०३ |
| १२ | क | दूरध्वनीचालक | ०२ |
| १३ | क | लिपिक टंकलेखक (लेखा लिपीक) | १६२ |
| १४ | क | वाहनचालक | ०२ |
| १५ | ड | दप्तरी | ३२ |
| १६ | ड | नाईक | १८ |
| १७ | ड | उद्वाहन चालक | ०३ |
| १८ | ड | सहायक बांधणीकार | ०१ |
| १९ | ड | शिपाई | ५२ |
| २० | ड | पहारेकरी | ०२ |
| २१ | ड | सफाईगार | ०१ |
|  |  | एकूण पदे | १६७८ |